# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

फोन नं
०२४०-२४७३४६१,६२,६३

प्रादेशिक कार्यालय,
प्लॉट नं ए-४/१, पर्यावरण भवन,
दै लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा
औद्यागिक क्षेत्र, जालना रोड,
औरंगाबाद

जा. क्रं मप्रनिम/प्रकाऔ/१०९८ /२०१९ दिनांक ०७ /०८ /२०१९

## कार्यालयीन आदेश

मा. राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक २९/०९/२०१८ रोजी आदेश पारित करताना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण प्राथम्य क्र. **I** ते **V** प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्टयांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्टयांमधील ९ प्रदूषित पट्टे प्राधान्य क्र. **I**, ६ प्रदूषित पट्टे प्राधान्य क्र. **II**, १४ प्रदूषित पट्टे प्राधान्य क्रमांक **III**, १० प्रदूषित पट्टे प्राधान्य क्र. **IV** व १४ प्रदूषित पट्टे प्राधान्य क्र. **V** मध्ये समाविष्ट आहेत.

मा. हरित लवाद, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशांनुसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृती आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरीता नदी पुनरुत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Force**) ची स्थापना प्रदूषण पट्टे असलेल्या जिल्हयांनी करावयाची असल्याचे आदेश देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शासन खालील प्रमाणे आदेशित केले आहे.

सदरील संदर्भात विस्तृत कार्यालयीन टिप्पणी मा. जिल्हाधिकारी यांचे कडे सादर करण्यात येउन मा. जिल्हा न्यायाधीश तसेच मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्याही निदर्शनास आणून देण्यात आली. सदर कार्यालयीन टिप्पणीस अनुसरून नांदेड जिल्हयासाठी मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदुषीत नदी पट्टयामधील प्रदुषण रोखण्याकरीता पुढील प्रमाणे स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Force**) ची स्थापना या कार्यालयीन आदेशाद्वारे करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने खालील स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची समिती गठीत करण्यात आली आहे.

| **अ.क्र.** | **स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाचे सदस्य** | **मा. सदस्य यांनी नेमुन दिलेले प्रतिनीधी व त्यांचे पद** |
|---|---|---|
| १ | मा. जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी | निवासी जिल्हाधिकारी, नांदेड |
| २ | मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी | सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण नांदेड |
| ३ | मा. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी | उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नांदेड |
| ४ | मा. विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी | अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड |

सदरील स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाने विहीत कालावधीमध्ये बैठका घेण्यात येउन मा. राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशांचे व राज्यातील नद्यांच्या प्रदुषित पट्ट्यामधील कृती आराखडा राबविण्याकरीता महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक **NGT-2018**/प्र.क्र २/तां. क ३ दि १३/१२/२०१८ नुसार कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचे इतिवृत्त वेळोवेळी या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद

**प्रत माहितीस्तव सादर :-**

1. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.
2. मा. जिल्हा न्यायाधीश, नांदेड
3. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, नांदेड
4. सह संचालक (हप्रनि) म. प्र. नि. मंडळ, मुंबई.

**प्रत:-**

1. मा. निवासी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
2. श्री. रमाकांत धोंडीबा पांचाळ, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण नांदेड
3. श्री. एम. एस. मोरे, अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड
4. उप- प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नांदेड - यांनी प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद यांचे प्रतिनीधी म्हणून कार्य करावे व विहीत कालावधीमध्ये बैठकांचे आयोजन करून सदर बैठकिचे इतिवृत्त संबंधीत मा. सदस्यांना सादर करण्यात यावेत.